

# मुंबई विद्यापीठ

डॉ. अजय प्र. देशमुख
एम.ए., पीएच.डी.
कुलसचिव

REG/ICC/2019-20/28

## परीपत्रक

विषय : राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड – १९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक ऊपाय म्हणून कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती नियंत्रित करण्याबाबत.

संदर्भ : १) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क. करोना –२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य–५, दि. १४/०३/२०२०
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क. करोना –२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य–५, दि. १५/०३/२०२०
३) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकिर्ण–२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि–१ दि. १६.३.२०२०
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. समय–२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.व का.) दि. १८.३.२०२०
५) संकिर्ण–२०२०/प्र.क्र.६०/२०/तां.शि–१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १९ मार्च २०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी संदर्भाधिन पत्र क्र ५ नुसार कोरोना विषाणूंचा प्रसार राज्यातील कार्यालयांमध्ये होऊ नये यास्तव प्रतिबंधात्मक ऊपाय म्हणून तातडीने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील गर्दी कमी करण्याच्या अनुषंगाने परंतू शासकीय कार्यालयांतील तातडीची व महत्वाची कामे सुरु राहण्याच्या दृष्टीने संबंधित विभाग प्रमुख /कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व अधिकारी /कर्मचा–यांना दररोज कार्यालयात न बोलवता त्यांना आळीपाळीने (Rotation) कार्यालयात बोलवावे. तद्‌वतच, त्यांना कार्यालयीन वेळेमध्ये लवचिकतेची सवलत देण्यासंदर्भात संबधित विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत नमुद केले आहे. या अनुषंगाने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील अनावश्यक गर्दी कमी होऊ शकेल व कार्यालयातील एकूण अधिकारी/कर्मचा–यांची संख्या ५० टक्के राहील याची दक्षता घेण्याबाबत देखील सुचीत केले आहे. अश्या परिस्थीती मध्ये सर्व अधिकारी/कर्मचा–यांनी त्यांचे अनुपस्थितीच्या दिवशी प्रलंबित राहिलेली कामे त्यांचे कार्यालयातील उपस्थितीच्या दिवशी पुर्ण करण्याच्या सूचना संदर्भ क्रमांक ४ अन्वये सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या या निर्णयान्वये निर्गमित केलेल्या सुचना राज्यातील सर्व अकृषी/अभिमत/तंत्रशास्त्र/स्वयंअर्थ सहाय्यीत विद्यापीठांना लागू राहतील. सदरचे निर्णय दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत लागू असल्याबाबत देखील सूचित करण्यात आले आहे.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ ते ५ चे अनुषंगाने, मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थाचे संचालकांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयातील सुचनांनुसार स्थानिक परिस्थीतीचा आढावा घेवून याबाबत आपल्या स्तरावरुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

दिनांक – १९ मार्च, २०२०

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी –
मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक.

महात्मा गांधी मार्ग, फोर्ट परीसर, मुंबई ४०० ०३२. दुरध्वनी : ९१-२२-६८३२ ०००७.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ, मुंबई ४०० ०९८.
ईमेल.: registrar@fort.mu.ac.in वेबसाईट.: www.mu.ac.in

Scanned by TapScanner